# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

## मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## एम. ए. मराठी (M49) शिक्षणक्रम

### क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रम (Field Project) (MAR582)

### अभ्यास विषयसूची

---

१. स्थानिक लेखक/ लेखिका यांची मुलाखत (किमान ०२).
२. स्थानिक कवी/कवयित्री यांची मुलाखत (किमान ०२).
३. बँकांमध्ये मराठी भाषेचा वापर : सर्वेक्षण आणि विश्लेषण (ग्राहक, कर्मचारी, अधिकारी प्रत्येकी ०४).
४. टपाल कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर : सर्वेक्षण आणि विश्लेषण (ग्राहक, टपाल प्रतिनिधी, अधिकारी प्रत्येकी ०४).
५. विमा कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर : सर्वेक्षण आणि विश्लेषण (ग्राहक, विमा प्रतिनिधी, अधिकारी प्रत्येकी ०४).
६. सरकारी किंवा खासगी कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर (प्रत्येकी ०२ कार्यालये).
७. विविध बाजारातील (भाजी बाजार, कापड बाजार, धान्य बाजार इत्यादी) मराठी भाषेचा वापर.
८. विविध माध्यमातील बातम्यांचे विश्लेषण (मुद्रित, श्राव्य, दृक - श्राव्य माध्यमे) (प्रत्येक माध्यमातील किमान १० बातम्या).
९. इयत्ता पहिली ते चौथीच्या मराठी भाषा शिक्षक व पालकांच्या मुलाखती आणि अहवाल लेखन (प्रत्येकी १०).
१०. इयत्ता पाचवी ते आठवीमधील मराठी भाषेचे विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या मुलाखती व अहवाल लेखन (प्रत्येकी १०).
११. इयत्ता नववी ते दहावीमधील मराठी भाषेचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या मुलाखती व अहवाल लेखन (प्रत्येकी १०).
१२. इयत्ता अकरावी ते बारावीमधील मराठी भाषेचे विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या मुलाखती व अहवाल लेखन (प्रत्येकी १०).
१३. पदवी स्तरावरील कोणत्याही शाखेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या मुलाखती व अहवाल लेखन (प्रत्येकी १०).
१४. इयत्ता आठवी ते दहावीच्या मराठी क्रमिक पाठ्यपुस्तकांसंदर्भात विद्यार्थी व शिक्षकांच्या मुलाखती व अहवाल लेखन.
१५. इयत्ता अकरावी ते बारावीच्या मराठी क्रमिक पाठ्यपुस्तकांसंदर्भात विद्यार्थी व शिक्षकांच्या मुलाखती व अहवाल लेखन.
१६. पदवीस्तरावरील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमासंदर्भात विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मुलाखती व अहवाल लेखन.
१७. ग्रंथालयातील वाचकांचे सर्वेक्षण आणि विश्लेषणात्मकअहवाल लेखन.
१८. आपल्या परिसरातील विविध खेळ व त्यासबंधी शब्दांचे संकलन आणि विश्लेषणात्मकअहवाल लेखन.
१९. विविध धर्मियांचे सण-उत्सव, जत्रा-यात्रा यासंबंधी शब्दसूचीचे संकलन, विश्लेषण व अहवाल लेखन (किमान ५०० शब्द).
२०. आपल्या परिसरात स्वयंपाक घर आणि पाककलेशी सबंधित मराठीतील शब्दांची सूची (किमान ५००) व अहवाल लेखन.
२१. शेती सबंधित मराठीतील शब्दांची सूची (किमान ५०० शब्द) तसेच अहवाल लेखन.
२२. आपल्या गावातील बोली भाषेमध्ये आलेल्या अन्य भाषेतील शब्द वाक्यामध्ये उपयोग करून लिहा. (किमान २५० शब्दांचे २५० वाक्यात उपयोजन).
२३. आपल्या परिसरातील लोकगीतांचे संकलन आणि विश्लेषणात्मक अहवाल लेखन (२५ लोकगीते).
२४. आपल्या परिसरातील लोककथांचे संकलन आणि विश्लेषणात्मक अहवाल लेखन (२५ लोककथा).
२५. आपल्या परिसरातील लोककलांचे संकलन आणि विश्लेषणात्मक अहवाल लेखन (किमान ०५ लोककला).
२६. दूरचित्रवाणीवरील मराठी कार्यक्रमांचा परिणाम – विश्लेषण (किमान ०५ कार्यक्रम).
२७. विविध माध्यमातील जाहिरातीमधील मराठी भाषा (मुद्रित, श्राव्य, दृक - श्राव्य माध्यमे) (प्रत्येक माध्यमातील किमान १० जाहिराती).

२८. आपल्या परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक घडामोडीचे वृत्तांतलेखन (किमान १० कार्यक्रम).
२९. मराठी चित्रपटातील भाषेचे विश्लेषण तसेच अहवाल लेखन (किमान ०४ चित्रपट).
३०. विविध भाषांमधून मराठीत पुनध्वनीमुद्रित होऊन आलेल्या चित्रपटांचा सामाजिक व भाषिक परिणाम (किमान ०४ चित्रपटांचे सर्वेक्षण).
३१. मोबाईलमधील संदेशांची मराठी भाषा यावर विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३२. यूट्यूबवरील विविध कार्यक्रमांमध्ये वापरली जाणारी मराठी भाषा (किमान २० कार्यक्रम).
३३. समाज माध्यमांमध्ये (सोशल मीडिया) वापरली जाणारी मराठी भाषा यावर विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३४. इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील मराठी भाषेच्या अध्ययनामध्ये येणाऱ्या अडचणी विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३५. इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील मराठी भाषेच्या अध्यापनामध्ये येणाऱ्या अडचणी विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३६. हिंदी माध्यमातील मराठीच्या अध्ययनातील समस्या विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३७. हिंदी माध्यमातील मराठीच्या अध्यापनातील समस्या विश्लेषणात्मक अहवाल लेखन.
३८. स्थानिक बोलीभाषेतील म्हणी, वाकप्रचार, उखाणे यांचे संकलन आणि विश्लेषण तसेच अहवाल लेखन (प्रत्येकी २५).
३९. आपल्या परिसरातील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्री-पुरुष कारागीरांच्या मुलाखती आणि त्यांच्या व्यवसायासंबंधी शब्दसूची यावर विश्लेषणात्मक अहवाल लेखन. (किमान एका व्यवसायातील किमान चार कारागीर)
४०. परिसरातील मराठी भाषा व साहित्यविषयक काम करणाऱ्या कोणत्याही किमान तीन संस्थांना भेट देऊन अहवाल लेखन.
४१. महाराष्ट्र राज्य शासनाच्या मराठी भाषेच्या विकास आणि संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या कोणत्याही दोन संस्थांच्या कार्यालयांना भेटी देऊन अहवाल लेखन.
४२. मराठी शाळेतील ग्रंथालयांचे सर्वेक्षण व अहवाल लेखन (कोणत्याही ०४ शाळा).
४३. महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध समित्यांवरील सदस्यांच्या मराठी भाषेसंदर्भात मुलाखती (किमान ०४ सदस्य).
४४. स्थानिक स्वराज्य संस्थामधील विविध कार्यक्षेत्रातील दैनंदिन पत्रलेखनाचे नमुने तपासून अहवाल लेखन (किमान २० नमुने).
४५. अन्य भाषिकांना मराठीचा वापर करताना येणाऱ्या समस्यांच्या संदर्भात सर्वेक्षण आणि अहवाल लेखन (किमान २० मुलाखती).

आपण मार्गदर्शकांच्या संमतीने वरील विषयांव्यतिरिक्त मराठी भाषा आणि साहित्यासंबंधी अन्य विषयांची निवड करू शकता.

## अधिक माहितीसाठी

क्षेत्रीय प्रकल्पाबाबत काही शंका असल्यास विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या केंद्र समन्वयक, सबंधित विषयाचे मार्गदर्शक किंवा विद्याशाखेतील शिक्षणक्रम संयोजक यांच्याशी संपर्क साधावा.

- शिक्षणक्रम संयोजक : डॉ.बाळासाहेब दिघे (marathi.shu@ycmou.ac.in)

## पत्रव्यवहारासाठी पत्ता

मा. संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री परिसर, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२
**दूरध्वनी : ०२५३-२२३१४७५**
**ई-मेल** : director.shu@ycmou.ac.in